दै. ऐक्य प्रकाशन स्थळ : सातारा दूरध्वनी : ०२१६२-२३७४४०/४१
दिनांक : १३.६.२०२१

# तिसरी लाट थोपवण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा : ना. बाळासाहेब पाटील

## भारत फोर्जकडून २४ गावांना कोविड रोखण्यासाठी मदत

सातारा, दि. १२ : कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत देशाचे, राज्याचे व जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल, पोलीस व आरोग्य विभाग पहिल्या कोरोनाच्या लाटेपासून काम करत आहेत. कोरोनाची तिसरी लाट येण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. या लाटेचा प्रभाव रोखण्यासाठी सर्व विभागांची मदत घेवून तिसऱ्या लाटेचा प्रभाव जाणवणार नाही यासाठी आत्तापासूनच प्रयत्न सुरू केले पाहिजेत. या कामात नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

भारत फोर्ज लि. पुणे यांच्याकडून सी.एस.आर. निधीतून सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, खटाव व माण तालुक्यातील एकूण २४ गावांना कोविड-१९ साठी लागणाऱ्या भौतिक सुविधा व साधनांचे वितरण धामणेर, ता. कोरेगाव येथे पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, प्रांताधिकारी ज्योती पाटील, तहसीलदार अमोल कदम, भारत फोर्जच्या लीना देशपांडे, सुनील माने, ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी व विविध गावांचे सरपंच उपस्थित होते.

भारत फोर्जच्या कोरेगाव, खटाव व माण तालुक्यातील २४ गावांमध्ये विविध विकासकामे सुरू आहेत. भारत फोर्जचा उपक्रम अतिशय चांगला असून त्यांच्या कामाची व्याप्ती वाढवून विविध गावांचा विकास केला पाहिजे. २४ गावांची गरज ओळखून कोरोनाच्या लढ्यासाठी लागणारी औषधे व इतर साहित्य आज पुरवले आहे. त्याबद्दल पालकमंत्री पाटील यांनी आभार मानले.

जिल्हाधिकारी शेखर सिंह म्हणाले, आज गावोगावी विलगीकरण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्यामुळे कोरोना रुग्णांना चांगला दिलासा मिळाला आहे. ग्रामदक्षता समितीचे काम चांगल्या पद्धतीने सुरू आहे. गावांना भेटी देण्यावर भर असून भेटी प्रसंगी ज्या अडचणी सांगण्यात येतात त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. ग्रामसेवक व तलाठी यांनी आपल्या गावातच उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. ग्रामदक्षता समितीने कोरोना रुग्णाच्या संपर्कात आलेल्या नागरिकांचा शोध घेवून त्यांची जास्तीत जास्त कोरोना चाचणी करावी. या कामासाठी शिक्षकांची मदत घ्यावी. याबाबतचे आदेशही काढण्यात आले आहेत. लसीचा अधिकचा पुरवठा मिळण्याचे संकेत मिळत आहेत. लसीकरणाबाबत योग्य नियोजन करावे, असे सांगून जिल्हाधिकारी शेखर सिंह यांनी भारत फोर्जचा उपक्रम स्तुत्य असल्याचेही सांगितले.

भारत फोर्ज गेली साडेतीन वर्ष विविध गावांमध्ये कामे करत आहे. सातारा जिल्ह्यातील २४ गावांमध्ये पाणी, आरोग्य, अंतर्गत रस्ते, गटारे व शिक्षण यासाठी काम करत आहे. हे काम करत असताना नागरिकांचे सहकार्य मिळाले. ही २४ गावे आदर्श गाव म्हणून पुढे घेतील, असा विश्वास भारत फोर्जच्या लीना देशपांडे यांनी व्यक्त केला. शहाजी क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले.